Impact Factor 2. 147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-XII Dec. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# पालकांच्या शिक्षणांचा आणि उत्पन्नाचा मुलांच्या भावनिक स्थिरतेशी असणाऱ्या संबंधाचे अध्ययन (वय १३ ते १६ वर्ष )

**डॉ. वैजयंती देशपांडे**
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख.
वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था नागपूर

**शोभना सुकारे**
संशोधक

**प्रस्तावना** :

कोणत्याही व्यक्तीचे वर्तन एखाद्या परिस्थितीमध्ये असणारा स्नेह, क्षमता, सुखदु:ख, भय, व्देष, क्रोध इत्यादि आंतरिक प्रवृत्ति व्दारे प्रभावित होत असतात. तेवढयाच आंतरिक प्रवृत्तींना भावनाचे नाव दिले गेले आहे. हया वरून स्पष्ट होते की, संवेगाचे काही न काही भाव असतात. स्कॉट आणि मॅकडुगल च्या नुसार संवेगामध्ये क्रियात्मक वृत्ती असते. भाव जेव्हा संवेगाचे रूप धारण करते तेव्हा ते व्यक्तिच्या क्रियेत अभिव्यक्त होत असते. संवेग अनेक प्रकारचे असतात. जसे उत्तेजना, पीडा, क्रोध, भय, प्रेम, व्देष इत्यादि. व्यक्तिच्या जीवनात अन्य प्रतिक्रिया, योग्यतांसारखे भावनांना सुध्दा महत्वाचे स्थान आहे.

**भावनात्मक स्थिरता** ( Emotinal Stability)

संवेग किंवा भावना ही जागृत अवस्थेचा अनुभव असतो, ज्याव्दारे मूलं आपले भाव आनंद व दु:ख या दोघात दर्शवितात. संवेग किंवा भावना दु:ख आणि हर्ष व्यक्त करण्याचे एकमात्र माध्यम आहे.

काही मुले आपल्या संवेगांवर नियंत्रण ठेवू शकत नाही, तर काही त्यावर नियंत्रण ठेवू शकतात. पालक आपल्या मुलांची चुक झाल्यास त्यांना मारतात आणि मुलगा आपली चूक समजून क्षमा मागतो, किंवा दूसऱ्यांदा तीच चुक न करण्याचा निश्चय करतो, तेव्हा मुलांमध्ये आपल्या भावनांवर पूर्ण नियंत्रण आहे असे म्हणू शकतो. परंतु जर मुलगा चूक करून उलट उत्तर देतो, तीच चूक वारंवार करतो, तेव्हा त्या मुलामध्ये भावनांवर नियंत्रण नाही, असे म्हणू शकतो. भावनांवर नियंत्रण ठेवण्याच्या स्थितीला भावनात्मक स्थिरता म्हणतात. भावनात्मक स्थिरतेचा अर्थ संवेगावर पूर्ण नियंत्रण ठेवणे आणि भावनिक वर्तन संतुलित असणे असा होय.

भावना जीवनासाठी आवश्यक असल्या तरी त्याचा अतिरेक हानिकारक होवू शकतो. अति दु:ख, अति आनंद, अति क्रोध इत्यादी भावना स्वत:च्याच नाही, तर दुसऱ्यांच्या दृष्टिने सुध्दा योग्य नसतात. भावनाच्या अतिरेकांमुळे व्यक्तीची एकाग्रता भंग होते. शाळेच्या मुलांमध्ये भावनिक अस्थिरता असल्याने ते कोणतेही कार्य मन लावून करू शकत नाही. अत्यंत क्रोधी, किंवा व्देष करणाऱ्या व्यक्तीला समाज ही स्वत:हून दूर करतो. व्यक्तीला स्वत:च्या भावनावर नियंत्रण ठेवायला शिकणे महत्वाचे असते. ज्या प्रकारे भावनांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे, त्याचप्रकारे भावनांचे अभिव्यक्तीपण आवश्यक आहे.

भावनात्मक स्थिर असलेल्या व्यक्ती हया रोजच्या जीवनात येणारे मानसिक त्रास , ताण आल्यास सर्वकाही भावनिक न होता, न घाबरता, डोक्याला ताण न देता, क्रोधाविष्ट न होता सहन करू शकतात व क्षुल्लक व कमी भावनिक ताणाच्या परिस्थितीमध्ये शांतता बाळगतात, योग्यरितीने व सर्वसाधारणपणे आपल्या मूलभूत मनस्थितीमध्ये स्थिर राहतात, आणि जरी ते मानसिक ताणाच्या प्रसंगातून गेले किंवा असाधारण प्रसंगातून गेले तर ते लगेच आपल्या पुर्व मन:स्थिती मध्ये परत येतात.

भावनात्मक स्थिरता ही मानवी जीवनाचे महत्वपूर्ण अंग आहे. कोणतीही व्यक्ती आपल्या भावनात्मक विचारांवर संयम ठेवण्यास, व्यक्त करण्यास सक्षम असायला हवी. स्कॉट (१९६८) च्या नुसार भावनात्मक स्थिरता ही मानसिक स्वास्थ्या करिता एक महत्वपूर्ण विशेष सूचक आहे. भावनिक स्थिरता मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रीयेवर पण प्रभाव करीत असते.(Sengupta,1985 P1).

**संशोधनाची उद्दिष्टे** (Objective of the study)

१. मुले आणि मुलींच्याभावनिक स्थिरतेचे अध्ययन करणे.
२. पालकांच्या शिक्षणाचा मुलांच्या भावनिक स्थिरतेशीअसणारा संबंध तपासणे.
३. पालकांच्या उत्पन्नाचा मुलांच्या भावनिक स्थिरतेशीअसणारा संबंध तपासणे .

**संशोधन कार्यपध्दती :** हया संशोधनासाठी १३ ते १६ वयोगटातील १०० मुलामुलींचा अभ्यास केला गेला. यात ५० मुलींचा व ५० मुलांचा समावेश केला गेला. संशोधनाकरिता हेतूपुरस्सर याद्यृच्छीक नमुना निवड पध्दतीचा उपयोग करण्यांत आला. प्रस्तुत संशोधनात नागपुर शहरातील विविध शाळेच्या विदयार्थ्यांचा समावेश केला गेला.

भावनात्मकता स्थिरता ही मापिका डॉ. ए. सेन गुप्ता (पटना) व डॉ. ए. के. सिंग (पटना) यांनी तयार केलेली असूनया मापिकेत एकूण १५ प्रश्न दिलेले आहेत. प्रश्नांचे उत्तर होय आणि नाही या दोन्ही विधानावरून केले गेले. ०–७ गुणापर्यंत मिळालेल्या नमुन्याची भावनिक स्थिरता ही चांगली आहे व ७ गुणांच्या वर मिळालेल्या नमुन्यांची भावनात्मक स्थिरता ही कमी अश्या प्रकारची ही चाचणी आहे.

**संशोधनाच्या मर्यादा** : हे संशोधन फक्त नागपुर शहरातील शाळांपुरतेच मर्यादीत असून संशोधनात फक्त दोन घटकांचे अध्ययन करण्यात आले आहेत.

१. पालकांचे शिक्षण
२. पालकांचे उत्पन्न

**विश्लेषण आणि अर्थनिर्वचन**

कुटुंब संस्था ही संयुक्त असो वा विभक्त मुलांच्या प्रत्येक विकासावर कुटुंबाचा परिणाम हा होत असतो. त्याचप्रमाणे कुटुंबाचे उत्पन्न आणि पालकांचे शिक्षण यांच्याशी संबंधीत उपलब्ध तथ्यांचे सारणीयन करण्यात आले आहे. कारण मुले भावनिकरित्या आपल्या कुटुंबाशी जोडलेले असतात. मुलांकडे पालकांचे लक्ष आणि दुर्लक्ष यांचा परिणाम देखिल मुलांवर दिसून येतो.

मुलांची आणि मुलींची भावनिक स्थिरता दर्शविणारी

**सारणी क्र : १**

| अ. क्र | एकुण(५०) मुली/मुले | ०–७ उच्च भाव. स्थिरता | टक्केवारी % | ८–१५ निम्न भाव.स्थिरता | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुली | २० | ४०% | ३० | ६०% |
| २. | मुले | २६ | ५२% | २४ | ४८% |

वरील तकत्यांत मुलींची व मुलांची भावनिक स्थिरता दिसून येत आहे. या तक्त्यात मुलींची भावनिक स्थिरता ही ४०% आणि मुलांची भावनिक स्थिरता टक्केवारी ५२%असुन ती जी मुलींच्या तुलनेत जास्त आहे.याचे कारण असे असू शकते की मुलांवर बरीच कामे सोपविली जातात, हळुहळु मुले आपल्या कामात तरबेज होवून आत्मविश्वासाने परिस्थिती हाताळण्यास यशस्वी होतात. त्यांची भावनिक परिपक्वता हळुहळु विकसित होते, परिणामी भावनिक चलबिचलता कमी होवुन भावनिक स्थिरता वाढते.

स्तंभालेख क्र. १

मुलींची आणि मुलांची भावनिक स्थिरता दर्शविणारा स्तंभालेख




स्तंभालेख क्र. २

पालकांचे आर्थिक उत्पन्न आणि मुलींची भावनिक स्थिरता दर्शविणारा स्तंभालेख




हया संशोधनात रु.१०००– ५००० पालकांचे मासिक उत्पन्न असणाऱ्या मुलींची भावनिक स्थिरतेची टक्केवारी ४३.७% दिसून आली. त्याचप्रमाणे रु.५००१–१०००० पर्यत मासिक उत्पन्न असणाऱ्या मुलींची टक्केवारी ४१.१% दिसून आली. त्याचप्रमाणे रु.१०००१–१५००० पालकांचे उत्पन्न असणाऱ्या मुलींची टक्केवारी ७०.५% दिसुन आली. यात असे दिसुन आले की, आर्थिक उत्पन अधिक असलेल्या पालकांच्या मुलींमध्ये भावनिक स्थिरता ही अधिक आढळून आली

स्तंभालेख क्र. ३

पालकांचे आर्थिक उत्पन्न आणि मुलांची भावनिक स्थिरता दर्शविणारा स्तंभालेख



सारणी क्र. ३ मध्ये पालकांचे आर्थिक उत्पन्न आणि मुलांची भावनिक स्थिरता दर्शविण्यात आली आहे. हया संशोधनात रु. १०००— ५००० पालकांचे मासिक उत्पन्न असणाऱ्या मुलांची भावनिक स्थिरतेची टक्केवारी ६२.५% दिसून आली. त्याचप्रमाणे रु.५००१—१०००० पर्यत मासिक उत्पन्न असणाऱ्या मुलांची टक्केवारी ४७.०५% दिसून आली. त्याचप्रमाणे रु.१०,००१—१५,००० पालकांचे उत्पन्न असणाऱ्या मुलांची टक्केवारी ७६.४% दिसुन आली. पालकांच्या उच्च उत्पन्नामुळे मुलांना आर्थिक दडपण नसल्याने भावनिक स्थिरतेची फारसे समायोजन करावे लागत नाही हयामुळे सुध्दा मुलांची भावनिक स्थिरता वाढण्यास मदत होत असावी.

**सारणी क्र : ४**

**पालकांचे शिक्षण आणि मुलींची भावनिक स्थिरता दर्शविणारी सारणी**

| अ.क. | पालकांचे शिक्षण | मुली ५० | उच्च भा.स्थिरता ०—७ | टक्केवारी% | निम्न भा.स्थिरता ८—१५ | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 10th-12th | 10 | 5 | 50% | 5 | 50% |
| 2 | B.A | 12 | 8 | 66.6% | 4 | 33.3% |
| 3 | M.A | 28 | 18 | 64.2% | 10 | 35.8% |

सारणी क्र ४ मध्ये पालकांचे शिक्षण आणि मुलींची भावनिक स्थिरता दिसून येत आहे. यात १० ते १२ व्या वर्गात शिकलेल्या पालाकांच्या मुलींची टक्केवारी ५०% आणि दिसून आली. त्याचप्रमाणे पदवीपर्यत शिक्षण असलेल्या पालकांच्या मुलींची टक्केवारी ६६.६% दिसून आली. त्याचप्रमाणे स्नातकोत्तर शिकलेल्या पालकांच्या मुलींची भावनिक स्थिरतेंची टक्केवारी ६४.२% दिसून आली. यावरून असे दिसून आले की पालकांच्या शिक्षणामुळे त्यांच्या पालकांशी असणारा संवाद अधिक चांगला असल्या कारणाने भावनिक स्थिरता अधिक आढळली. तसेच उच्च शिक्षित पालकांचा मुलींना अभिमान आणि आधार वाटत असल्याने पण स्थिरता वाटत असावी.

**स्तंभालेख क्र. ४**

**पालकांचे शिक्षण आणि मुलींची भावनिक स्थिरता दर्शविणारा स्तंभालेख**




**सारणी क्र : ५**

**पालकांचे शिक्षण आणि मुलांची भावनिक स्थिरता दर्शविणारी सारणी**

| अ.क. | पालकांचे शिक्षण | मुले ५० | उच्च भा. स्थिरता ०—७ | टक्केवारी % | निम्न भा. स्थिरता ८—१५ | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 10th-12th | 15 | 10 | 66.6% | 5 | 33.3% |
| 2 | B.A | 14 | 10 | 71.4% | 4 | 28.6% |
| 3 | M.A | 21 | 18 | 85.7% | 3 | 14.3% |

सारणी क्र ५ मध्ये पालकांचे शिक्षण आणि मुलांची भावनिक स्थिरता दिसून येत आहे. यात १० ते १२ व्या वर्गात शिकलेल्या पालकांच्या मुलांची टक्केवारी ६६.६% आणि दिसून आली. त्याचप्रमाणे स्नातक शिकलेल्या पालकांच्या मुलींची टक्केवारी ७१.४% दिसून आली. त्याचप्रमाणे स्नातकोत्तर शिकलेल्या पालकांच्या मुलींची भावनिक स्थिरतेंची टक्केवारी ८५.७% दिसून आली.

**स्तंभालेख क्र. ५**

**पालकांचे शिक्षण आणि मुलांची भावनिक स्थिरता दर्शविणारा स्तंभालेख**




**पालकांचे शिक्षण आणि मुलांची आणि मुलीच्या भावनिक स्थिरतेचा सहसंबंध दर्शविणारा तक्ता**

| पालकांचे शिक्षण | मुली | मुले |
|---|---|---|
| १० वी ते १२वी वर्ग | —०.७५ | ०.८ |
| स्नातक | ०.०७ | ०.४ |
| स्नातककोत्तर | ०.०६ | ०.१७ |

वरिल सारणीमध्ये पालकांच्या शिक्षणाचा आणि मुलांच्या भावनिक स्थिरतेचा सहसंबंध दर्शविण्यात आला आहे. सारणीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, फक्त १२ वी पर्यंत शिक्षण असलेल्या पालकांच्या मुलींची भावनिक स्थिरतेचा सहसंबंध —०.७५ नकारात्मक सहसंबंध वगळता, सकारात्मक असला तरी हा सहसंबंध अतिशच अल्प किंवा लक्षणीय नाही. या संदर्भात ज्या संभाव्य करणाचा मागोवा घेतला तेव्हा असे आढळले की मुलांना पालकांच्याा शिक्षणाचे महत्व कळण्यास बराच अवकाश असू शकतो. कदाचित तेवढी वैचारिक परिपक्वत देखिल मुलांमध्ये नसण्याची शक्यता अधिक असू शकते. अर्थात अध्ययानाच्या उदिष्टयानुसार असे निदर्शनास आले की पालकांचे शिक्षण आणि मुलांची भावनिक स्थिरता हयामध्ये निश्चित सहसंबंध आढळुन आला व तो जरी अल्प असला तरी आढळून आला.थोडक्यात ज्या पालकांचे शिक्षण अधिक त्या पालकांचा मुलांशी असणारा संवाद आणि वर्तन अधिक चांगला असल्या करणाने सकारात्मक आढळून आला आहे. ज्या पालकांचे शिक्षण स्नातककोत्तर झाले आहे अशा पालकांच्या मुलांची भावनिक स्थिरता ही त्यातल्यात्यात उच्च दिसून आली.—०.७५ हा नकारात्मक असला संबंध असला तरीहि तो उच्च प्रतिचा आहे. मुलींच्याा बाबतीत असे असू शकते की आपल्या पालकांचे शिक्षण काहीसे कमी असल्याने भविष्यात आपल्याला अनेक जबाबदाऱ्या स्विकारूनच स्वत:ला सिध्द करायचे आहे असे वाटत असल्याने त्यांच्या मनाची तयारी होत असावी म्हणून ही हा संबंध उच्च प्रतीचा असेल असे वाटते.

**पालकांचे उत्पन्न आणि मुलांची भावनिक स्थिरता यांचा सहसंबंध दर्शविणारा तक्ता**

| पालकांचे उत्पन्न | मुली | मुले |
|---|---|---|
| रु. १०००—५००० | ०.१९ | —०.४४ |
| रु. ५००१—१०,००० | ०.७८ | ०.५९ |
| रु. १०,००१—१५,००० | ०.८१ | ०.८५ |

वरिल सारणीमध्ये पालकांचे उत्पन्न आणि मुलांची भावनिक स्थिरतेचा सहसंबंध दर्शविण्यात आला आहे. रु. १०००—५००० उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांची भावनिक स्थिरतेचा सहसंबंध नकारात्मक दिसुन आला. त्याचप्रमाणे जसजसे पालकांचे उत्पन्न वाढले आहे तसतसे मुलांच्या भावनिक स्थिरतेत सुध्दा वाढझाल्याचे दिसून आले आहे. याचे कारण असे असु शकते की, हया वयातील मुलांना चांगले कपडे, जोडे, बॅग आणि इतर अनेक गोष्टींचे आकर्षन असते शाळेत इतर मुलांबरोबर खेळत असतांना कींवा वावरत असतांना दुसऱ्या मुलांकडे चांगलीवस्तु पाहुन आपल्याकडे त्या वस्तु का नाही, असे प्रश्न त्यांना भेडसावत असताा म्हणून आपल्या पालकांचे उत्पन्न कमी असल्याने आपण त्या वस्तु खरेदी करू शकत नाही. हया भावना त्यांच्यात निर्माण होतात जेणेकरून त्यांची भावनिक स्थिरता कमी झाली असावी. उच्च उत्पन्न असणाऱ्या मुलांची भावनिक स्थिरता ही सकारात्मक दिसुन आली. हा संबंध लक्षणीय आहे त्यामुळे पालकांचे उत्पन्न आणि भावनिक स्थिरता हयामध्ये उच्च प्रतीचा संबंध आढळून आला.

## निष्कर्ष :

१. मुलांची भावनिक स्थिरता ( 52%)ही मुलींपेक्षा अधिक दिसुन आली.
२. पालकांच्या शिक्षणांचा परिणाम व सहसंबंध मुलींच्या भावनिक स्थिरतेवर झाल्याचे दिसुन आले उच्च शिक्षीत पालकांच्या मुलांमधील भावनिक स्थिरता ही निम्न शिक्षीत पालकांच्या मुलांपेक्षा अधिक दिसुन आली.
३. पालकांच्या उत्पन्नाचा सहसंबंध मुलांच्या भावनिक स्थिरतेवर दिसुन आला आहे यात जास्त उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलामुलींमध्ये भावनिक स्थिरता ही जास्त आढळून आली.

थोडक्यात पालकांचे शिक्षण व पालकांचे उत्पन्न हया दोन्ही घटकांचा मुलांच्या भावनिक स्थिरतेशी उच्च प्रतीचा सहसंबंध असतो असे सिध्द झाले.

## शिफारसी :

१. कुटुंबात कुटुंबियांनी मुलांवर काही जबाबदारी ती लहान असली तरी टाकायला पाहीजे. ज्याव्दारे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढून भावनात्मक विकास सकारात्मक होण्यास मदत होईल शिवाय भावनात्मक स्थिरतेचा विकास होईल.
२. कुटुंबामध्ये आईने मुलीसोबत एक मैत्रिणीचे नाते जोडायला हवे जेणेकरून ती आपल्या मनातील भिती आपली भावना सहजतेने आईला सांगू शकेल.
३. मुलींचा आत्मविश्वास वाढविण्यास पालाकंनी तसेच शिक्षकांनी प्रोत्साहन देवून त्यांचा भावनात्मक विकास साधण्यास मदत केली पाहीजे.

## संदर्भ ग्रंथसुची :


- भटनागर ए. व्ही. भटनागर शिक्षा मनोविज्ञान, (२००६) आर. लाल बुक डेपो मेरठ
- प्रा. र. वि. पंडीत सामान्य मानसशास्त्र,(२००७) पिंपळापुरे अन्ड कं. पब्लिशर्स, नागपुर.
- Rajendra Study of Emotional stability of middle school children second survey of Res. In edu. (1991)
- Weinraub, M.HHandbook of parenting Vol 3,2nd.(2002)
- Website :www.emotional stability.com .
- Study of emotional stability.com